

महत्त्वाचे

वारकरी साहित्य संमेलनाचा समारोप

जालना : संत साहित्याची वैज्ञानिकदृष्ट्या चिकित्सा व्हावी, महाराष्ट्रात संतपीठ कार्यान्वित व्हावेत, अशी अपेक्षा वारकरी संत साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ह्यराचार्य डॉ रामकृष्ण महाराज लहवितकर यांनी आज रविवार, दि. १४ डिसेंबर रोजी येथे व्यक्त केली. महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांच्या अनुदानातून जालना एज्युकेशन सोसायटीतर्फे जेईएस महाविद्यालयात शनिवार, दि. १३ आणि रविवार असे दोन दिवस आयोजित वारकरी संत साहित्य संमेलनाच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष पुरुषोत्तम बगडिया हे होते. हभप प्रमोद महाराज जगताप हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी विचारपीठावर महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य प्रा. श्रीधर नांदेडकर, जालना एज्युकेशन सोसायटीचे सचिव श्रीनिवास भक्कड,स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री,कार्यवाह डॉ. यशवंत सोनुने, आदींची उपस्थिती होती.

लग्नासाठी १० लाखांचा गंडा

बीड : बीड शहरात लग्न जुळवून देण्याचे आमिष दाखवून एका ३९ वर्षीय तरुणाला तब्बल १० लाख रुपयांचा गंडा घातल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी वधूसह सात जणांविरुद्ध बीड शहर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी ३९ वर्षीय अभय अरुणराव खोडसकर यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार,अभय हे लग्न जमत नसल्यामुळे ते मानसिक तणावात होते. याच परिस्थितीचा फायदा घेत, रामकृष्ण उपाध्ये, रजनी उपाध्ये, उदय उपाध्ये, पल्लवी उपाध्ये आणि बुलढाणा जिल्ह्यातील उंदरी येथील प्रकाश व संगीता पैंढाने यांनी अभय यांना त्यांच्या गावातील मुलगी कोमल हिच्याशी लग्न जुळवून देण्याचे आमिष दाखवत लग्नासाठी आरोपींनी एकूण १५ लाख रुपये घेण्याचे निश्चित केले होते. यापैकी लग्नापूर्वी आणि लग्नानंतर फिर्यादीकडून एकूण १० लाख रुपये स्वीकारण्यात आले. मात्र लग्नानंतर तीन महिन्यांनी कोमल कुणालाही न सांगता निघून गेली. या प्रकरणी कोमलसह सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

उमेदवारीसाठी साकडे

छत्रपती संभाजीनगर : संभाजीनगर जिल्हा अल्पसंख्याक व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने आगामी जिल्हा परिषद महानगरपालिका पंचायत समिती निवडणुकीत पदाधिकाऱ्यांना उमेदवारी देण्यासाठी अल्पसंख्यांकचे विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार इम्रान प्रतापगढी यांना आज रविवार, दि. १४ रोजी निवेदन निवेदन देण्यात आले. दिल्ली येथे भेट घेऊन खासदार प्रतापगढी यांना हे निवेदन देण्यात आले आहे. यावेळी अल्पसंख्या विभागाचे काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष इब्राहिम पठाण, अल्पसंख्यांक जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष अनिस पटेल, अल्पसंख्याक शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मोहन इनामदार, अहमद चाऊस, आमेर अब्दुल सलीम, इरफान पठाण सय्यद, फराज आबेदी, विकास खन्ना, सोनू शर्मा आदी उपस्थित होते.

पं. समितीचा पदभार सानप यांच्याकडे

बीड : मग्रारोहयो अंतर्गत बीड तालुक्यामध्ये सन २०२३-२४ मधील डिलीट झालेले वर्ककोड लाभार्थ्यांकडून पैसे घेऊन, नियमबाह्यपणे पुन्हा सन २०२५-२६ मध्ये काढल्याप्रकरणी गटविकास अधिकारी व सहाय्यक कार्यक्रम अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादीचे युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली होती. यानंतर दि.९ डिसेंबर रोजी वादग्रस्त गटविकास अधिकारी अशोक राठोड यांच्याकडील पदभार काढून त्याठिकाणी अनिरुद्ध सानप यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बीड पंचायत समिती अंतर्गत मग्रारोहयोमध्ये बीड तालुक्यातील वैयक्तिक लाभार्थींचे गायगोठा, वैयक्तिक जलसिंचन विहीर, शेततळे कामाचे सन २०२३-२४ मधील ६४०० वर्ककोड डिलीट झालेले आहेत. सदरील वर्ककोड हे कोणत्या आधारे डिलीट झाले याची माहितीही दिली जात नाही.

वाळू वाहतुकीवर कारवाई

गेवराई : तालुक्यातील तपोनिमगाव शिवारात ट्रॅक्टरच्या साहाय्याने सुरू असलेल्या अवैध वाळू वाहतुकीवर तलवाडा पोलिसांनी धडक कारवाई करत तब्बल ६ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिसांनी मिळालेल्या गुप्त माहितीवरून सापळा रचून ही कारवाई केली असून संबंधित ट्रॅक्टर चालकाविरुद्ध तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बीड जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून अवैध वाळू उपसा व वाहतुकीविरोधात प्रशासनाने कडक भूमिका घेत कारवाईचा सपाटा लावला आहे.

राष्ट्रीय महामार्गावर प्रवाशांना लुटणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

बीड स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई

बीड : प्रतिनिधी

बीड स्थानिक गुन्हे शाखेने धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर प्रवाशांना शस्त्राचा धाक दाखवून लुटणाऱ्या एका कुख्यात आणि सराईत टोळीचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईमुळे महामार्गावर झालेल्या एक दरोडा आणि तीन जबरी चोरीच्या गुन्ह्यांसह असे एकूण चार गंभीर गुन्हे उघडकीस आले असून, प्रवाशांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

पोलिस तपासात समोर आले की, या टोळीकडून महामार्गावर प्रवाशांची वाहने अडवली जात होती, वाहनाच्या काचा फोडून शस्त्राचा धाक दाखवला जात होता आणि त्यानंतर रोख रक्कम तसेच मौल्यवान वस्तूंची जबरी चोरी व दरोडा टाकला जात होता. धुळे सोलापूर या महामार्गावरील वाढत्या गुन्हेगारीच्या घटनांमुळे चीड पोलिसांनी याची गंभीर दखल घेतली होती. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या आदेशानुसार आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हेगारांचा छडा लावण्यासाठी विशेष पथक तयार करण्यात आले होते. या पथकातील पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर आणि त्यांच्या टीमला सीसीटीव्ही फुटेजचे विश्लेषण, तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे महत्त्वाचा सुगावा मिळाला, की आरोपी लूट करण्यासाठी कळंब (जि. धाराशिव) येथून केजच्या दिशेने त्यांच्या कारमधून येत असल्याची माहिती मिळाली. या माहितीनुसार, पोलिसांनी तातडीने महामार्गावर नाकाबंदी लावली.

फिल्मी स्टाईल पाठलाग करून आरोपी ताब्यात

दरम्यान, पोलिसांना पाहून आरोपींनी आपली कार न थांबवता, वेगाने पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, सतर्क असलेल्या पोलीस पथकाने त्यांचा फिल्मी स्टाईल पाठलाग करत, या गुन्हेगारांना त्यांच्या कारसह ताब्यात घेतले. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपीकडून एक काळ्या रंगाची विना नंबरची एमजी हेक्टर कार (गुन्ह्यासाठी वापरली जात होती). वाहनाच्या डिक्कीमध्ये दरोड्यासाठी वापरण्यात आलेला एक धारदार कोयता, लोखंडी रॉड (वाहन अडवून काचा फोडण्यासाठी वापरला जात होता, हे साहित्य पोलिसांनी जप्त केले.

अटक केलेल्या आरोपींची नावे

धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर प्रवाशांना शस्त्राचा धाक दाखवून लुटणाऱ्या आरोपींना बीड स्थानिक गुन्हे शाखेने बेड्या ठोकल्या असून ताब्यात घेतलेल्या आरोपींमध्ये राहुल अनिल काळे (वय १९ वर्षे),विकास अनिल काळे (वय २१ वर्षे),अनिल राम काळे (वय ४० वर्षे) यांचा समावेश आहे.

प्रेम प्रकरणातून तरुणाचे अपहरण करून मारहाण

मुलीच्या आईनेच तरुणाला उचलले

छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी

प्रेम प्रकरणातून एका २२ वर्षीय तरुणाचे सिडको बसस्थानकातून कारमधून तिघांनी अपहरण करून त्याला बेदम मारहाण करून पुन्हा सिडको बसस्थानकात आणून सोडल्याचा धक्कादायक प्रकार शनिवारी, दि. १३ रोजी दुपारी समोर आला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी एमआयडीसी सिडको ठाण्यात एका महिलेसह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, रात्री उशिरा महिलेला अटक करण्यात आले आहे. विशाल आबासाहेब येडके असे अपहरण झालेल्या तरुणाचे नाव असून तो सिडको बसस्थानकासमोर एका नाष्टा सेंटरवर काम करतो. विशालचे आरोपी महिलेच्या मुलीसोबत प्रेमसंबंध असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. या प्रकरणी सुरेश मोहन नरवडे (३५, रा. एसटी कॉलनी, मुकुंदवाडी) यांनी तक्रार दिली. नरवडे हे सिडको बसस्थानक परिसरात नाश्ता सेंटर चालवतात. शनिवारी दुपारी तीनच्या सुमारास त्यांचा भाचा विशाल सिडको बसस्थानक परिसरात आला होता. यानंतर काही वेळानंतर पांढऱ्या रंगाची स्विफ्ट कार आली त्यातून महिलेसह तिघेजण उतरले आणि विशालला मारहाण सुरू केली.तसेच, सर्वांसमोर त्याला बळजबरी कारमध्ये कोंबून अपहरण केले. अपहरणानंतर आरोपींनी विशालला कारमधून सातारा परिसरात नेले. प्रवासादरम्यान तसेच तेथे पोहोचल्यानंतर आणखी काही जणांना बोलावून त्याला बेदम मारहाण करण्यात आल्याचे विशालने पोलिसांकडे दिलेल्या जबाबात नमूद केले आहे. या प्रकरणाचा अधिक तपास उपनिरीक्षक पचलोरे करीत आहेत.

राज्यात कायदा-सुव्यवस्था आहे?

ससाणे यांच्यावरील हल्ल्यावर मुंडेंनी व्यक्त केली चिंता

बीड : प्रतिनिधी

ओबीसी आंदोलक ॲड. मंगेश ससाणे यांच्या गाडीवर अज्ञातांकडून दगडफेक करत हल्ला करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी धारूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेचा पुढील तपास धारूर पोलीस करत आहेत. मात्र या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे.दरम्यान, या प्रकरणाची गंभीर दखल घेत माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी आज रविवारी, दि. १४ रोजी विधानसभा अधिवेशनात ससाणे यांच्यावरील हल्ल्याचा मुद्दा उपस्थित करत राज्यात कायदा-सुव्यवस्था आहे की नाही?, असा सवाल उपस्थित केला.या प्रकरणी अधिक माहिती अशी, दोन महिन्यांपूर्वी पवन करपे यांच्यावर झालेल्या हल्ला प्रकरणाची माहिती घेण्याकरता ॲड. ससाणे हे माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गेले होते.

आरोपीवर कडक कारवाई केली जाईल

▶ दरम्यान, या प्रकरणावरून माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी आजघडीला सामाजिक आंदोलन करणारा कार्यकर्ता सुरक्षितपणे फिरू शकत नाही. या महाराष्ट्रातील सामाजिक समता संपली आहे का असा सवाल उपस्थित करत ससाणे यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा मुद्दा उपस्थित करत राज्यातील कायदा व सुव्यवस्थेविषयी चिंता व्यक्त केली. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात तात्काळ मोजक्या शब्दात उत्तर दिले. या प्रकरणातील आरोपीवर कडक कारवाई केली जाईल, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

अंबाजोगाईच्या 'एसआरटी'चा कायापालट होणार

अंबाजोगाई :अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ (एसआरटी) ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचा चेहरामोहरा आता पूर्णपणे बदलणार आहे. केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी या रुग्णालयाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला मोठे यश आले असून, त्यांच्या प्रयत्नांमुळे 'मास्टर प्लॅन'च्या कामाला आता वेग आला आहे. यासंदर्भात नागपूर येथील विजयगड येथे राज्याचे उपमुख्यमंत्री आणि बीडचे पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.एसआरटी रुग्णालयाच्या सक्षमीकरणासाठी आमदार नमिता मुंदडा या शासन दरबारी सातत्याने प्रयत्न करत आहेत. शुक्रवारी झालेल्या बैठकीत त्यांनी रुग्णालयाच्या विकासाचा रोडमॅप मांडला.

बीडमध्ये सराईत दुचाकीस्वाराला बेड्या

८ दुचाकी जप्त

बीड : प्रतिनिधी

बीड शहरासह परिसरातील वाढत्या दुचाकी चोरीसह गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी पोलिसांकडून विशेष कारवाई करण्यात येत आहे. या कारवाई दरम्यान, एका फायनान्स कंपनीत काम करताना शिकलेल्या वाहन उचलण्याच्या कौशल्याचा वापर करून दुचाकी चोरी करणाऱ्या आणि त्या बँकेने जप्त केलेल्या गाड्या आहेत, असे सांगून विकणाऱ्या सराईत चोराच्या बीड शहर पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. कृष्णा उमेश अंतरकर (वय २५, रा. शिवशक्ती नगर, पाथर्डी, जि. अहिल्यानगर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून त्याच्याकडून चोरीच्या ८ मोटरसायकली जप्त करण्यात आल्या आहेत.

बीड शहरात दुचाकी चोरीच्या घटना वाढल्याने पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी विशेष पथकाद्वारे तपासाचे आदेश दिले होते. बीड शहर ठाण्याच्या डिटेक्शन ब्रँचने (डीबी) तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीला बेड्या ठोकल्या. पोलिस तपासात उघड झाले की, आरोपी कृष्णा अंतरकर हा पूर्वी एका फायनान्स कंपनीत वसुलीचे काम करत असे. हप्ते थकलेल्या गाड्या ओढून आणण्याचे (रीपोझेशन) काम करताना त्याला गाड्या कशा लॉक न करता चालू करायच्या किंवा न्यायच्या, याचे कौशल्य प्राप्त झाले होते. याच कौशल्याचा गैरवापर करत त्याने बीडमधून गाड्या चोरण्यास सुरुवात केली. चोरी केलेल्या गाड्या तो पाथर्डी परिसरात नेत असे. तिथे तो स्वतः फायनान्स किंवा बँकेत कामाला असल्याचे सांगून, हप्ते थकल्यामुळे या गाड्या जप्त केल्या आहेत.

भूलथापांना बळी पडू नका; पोलिसांचे आवाहन

▶ दरम्यान, या सराईत चोराला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, पोलीस उपनिरीक्षक महेश जाधव आणि त्यांच्या पथकाने केली. नागरिकांनी फायनान्सची गाडी आहे किंवा ओढून आणलेली आहे अशा भूलथापांना बळी पडून कागदपत्रांची खातरजमा केल्याशिवाय कोणतेही वाहन खरेदी करू नये, असे आवाहन बीड शहर पोलिसांनी केले आहे.

बिबट्याने पाडला घोडा, मेंढीचा फडशा

फुलसांगवीत भीतीचे वातावरण

बीड : प्रतिनिधी

जिल्ह्यात बिबट्याचा वावर वाढला असून पशुधनांवर हल्ले वाढले आहेत. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. यातच शिरूर तालुक्यातील फुलसांगवी गावाच्या शिवारामध्ये गट क्रं १६२ मधील शेतीमध्ये पश्चिम महाराष्ट्रातून आलेल्या मेंढपाळांच्या कळपावरती बिबट्याने हल्ला चढवून घोड्यासह मेंढीची शिकार केली. बिबट्याच्या या हल्ल्यामुळे फुलसांगवी ग्रामस्थांसह परिसरामध्ये दहशत निर्माण झाली असून शेतकऱ्यांना रब्बी हंगामाची शेतीची कामे करणे आव्हानात्मक झाले आहे. या घटनेची माहिती मिळताच पाटोदा वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन घटनेचा पंचनामा केला. या हल्ल्यात मेंढपाळाचे सुमारे सत्तर ते पंच्याहत्तर हजार रुपये किमतीचा घोडा व पंधरा ते वीस हजार रुपये किमतीची मेंढी असा सुमारे एक लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. दरम्यान, फुलसांगवी परिसरामध्ये पहिल्यांदाच अशी घटना घडली असून, बिबट्याच्या दहशतीने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण असून, लवकरात लवकर या बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी जोर धरत आहे.

बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी

▶ फुलसांगवी परिसरामध्ये बिबट्या वावर हा शेतकऱ्यांसाठी धोका निर्माण झाला आहे. वन विभागाने या घटनेचे गांभीर्य ओळखून परिसरामध्ये कॅमेरे व पिंजरा पिंजरा लावून बिबट्याला बंदिस्त करून शेतकऱ्यांना भयमुक्त करावे, अशी मागणी फुलसांगवीचे सरपंच भास्कर सानप यांनी केली आहे.

मांजा विक्रेत्यांवर पोलिसांचा छापा

मांजा विक्रेत्यांवर पोलिसांचा छापा

कन्नड : प्रतिनिधी

मकर संक्रांतीनिमित्त मोठ्या प्रमाणात पतंग उडवण्यात येतात. यासाठी बंदी असलेल्या मांजाचा सर्रास वापर करण्यात येतो. यामुळे पोलिसांनी मांजा वापरावर बंदी घातली आहे. अशातच कन्नड शहर पोलिसांनी शहरातील पाढरी मोहल्ला येथील एका किराणा दुकानात बंदी असलेला नायलॉन मांजा विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर शनिवारी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास छापा टाकून २,७२० रुपयांचा नायलॉन मांजा जप्त केला. या प्रकरणी मुजक्कीर युनुस खान (वय ४२, रा. पाढरी मोहल्ला, कन्नड) याच्याविरुद्ध कन्नड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवून त्याला अटक करण्यात आली आहे. त्यानंतर जामिनावर सुटका देखील करण्यात आल्याचे सहाय्यक फौजदार नासेर पठाण यांनी सांगितले.मकर संक्रांतीनिमित्त पतंग उडविण्याचा छंद अनेकजण जोपासतात. मात्र दोराऐवजी नायलॉन मांजा वापरल्यामुळे पक्षी, लहान मुले व वाहनचालक जखमी होण्याच्या घटना घडत आहेत.

नायलॉन व सिंथेटिक मांजा पर्यावरणास घातक पक्ष्यांसाठी अत्यंत धोकादायक ठरत असल्याने त्यावर कायद्याने बंदी घालण्यात आली आहे.

प्रवेशद्वारावरच लावले एलईडी स्क्रीन

जालना : जालना जिल्ह्यातल्या अंबड तहसील कार्यालयाच्या प्रवेशद्वारावरच आता राजकीय पक्षाचे नेते,पदाधिकारी, आणि सर्वसामान्य नागरिकांना स्ट्राँग रूम मधील सर्व चित्रीकरण २४ तास पाहता येणार आहे. प्रशासनाकडून या ठिकाणी एलईडी स्क्रीन लावण्यात आले असून येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना सर्व चित्रीकरण पाहता येणार असून त्यांच्या मनातील भीती दूर होऊन पारदर्शकता दिसून येईल असी, प्रतिक्रिया अंबड चे तहसीलदार विजय चव्हाण यांनी दिली.

HDFC BANK
We understand your world
नोंदणीकृत कार्यालय : एचडीएफसी बँक हाउस, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल (पश्चिम), मुंबई ४०० ०१३ आणि रिटेल पोर्टफोलिओ व्यवस्थापन यांचे कार्यालय एचडीएफसी बँक लिमिटेड, पहिला मजला, आय थिंक टेक्नो कॅम्पस, कांजूर मार्ग (पूर्व) मुंबई ४०० ०४२

लिलाव विक्री सूचना

[illegible]

खाते क्र.	कर्जदाराचे नाव	कर्ज रक्कम रु.	लिलावाचे ठिकाण (ठावठिकाण पत्ता)
[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]

[illegible]

दिनांक : १५.१२.२०२५
ठिकाण : औरंगाबाद

स्वाक्षरी/-
प्राधिकृत अधिकारी
एचडीएफसी बँक लि.

धक्कादायक घटना... | घाटी रुग्णालयाच्या डॉक्टरांवर हलगर्जीपणाचा नातेवाईकांचा आरोप

डिस्चार्ज दिलेल्या रुग्णाचा २ तासांत मृत्यू

छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी

घाटी रुग्णालयातील डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे एका रुग्णाचा मृत्यू झाल्याचा आरोप केला जात आहे. छातीमध्ये दुखत असल्यामुळे शनिवारी दि, १३ डिसेंबर रोजी पहाटे चारच्या सुमारास प्रकाश तुळशीराम गायकवाड (४२) यांना उपचारासाठी घाटीत आणले होते. यावेळी डॉक्टरांच्या तपासणीत ईसीजी आणि रक्तदाब सर्वसामान्य (नॉर्मल) असल्याचे समोर आले. त्यामुळे उपचार करून त्यांना डिस्चार्ज देण्यात आला. मात्र, अवघ्या २ तासांत त्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे नातेवाइकांनी डॉक्टरांवर हलगर्जीपणाचा आरोप केला असून डॉक्टरांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंदवण्याची मागणी मृताचे भाऊ दीपक गायकवाड यांनी केली आहे. दरम्यान, या प्रकरणात घाटी प्रशासनाने ५ डॉक्टरांची चौकशी समिती स्थापन केली असून ८ दिवसांत अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

दरम्यान, डॉक्टरांवर कारवाईचे आश्वासन मिळत नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही, असा पवित्रा मृताच्या नातेवाइकांनी घेतला होता. त्यामुळे घाटी रुग्णालयात काही वेळ तणाव निर्माण झाला होता. चौकशीचे आश्वासन दिल्यानंतर सायंकाळी नातेवाइकांनी पार्थिव ताब्यात घेतले. या चौकशी समितीत अध्यक्ष म्हणून बधिरीकरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. गायत्री तडवळकर, सदस्य सचिव औषधशास्त्र विभागप्रमुख डॉ. शिराझ बेग, सदस्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुनिता जोशी, ओएसडी डॉ. सुरेश हरबडे, प्रशासकीय अधिकारी महेश गावडे यांचा समावेश आहे. घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी सांगितले, की मी स्वतः रुग्णाच्या नातेवाइकांशी बोललो आहे. सखोल चौकशी करून समिती ८ दिवसांत अहवाल देईल.

सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

▶ याबाबत दीपक गायकवाड यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १३ डिसेंबर रोजी पहाटे ४ वाजता माझे भाऊ प्रकाश यांची प्रकृती गंभीर झाल्याने त्यांना उपचारासाठी घाटीच्या अपघात विभागात दाखल केले. या ठिकाणी तपासणी करून ईसीजी काढून तो नॉर्मल असल्याचे सांगितले. विशेष म्हणजे या ईसीजीवरील तारीखही चुकीची होती.कोणतीही सखोल वैद्यकीय तपासणी व आवश्यक तातडीचे उपचार न करता केवळ काही गोळ्या देऊन घरी घेऊन जा, असे सांगितले. घरी गेल्यानंतर २ तासांनी पुन्हा त्रास सुरू झाला. त्यानंतर घाटीत आणले तेव्हा तपासून मृत घोषित केले. त्यामुळे या डॉक्टरांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा. डॉक्टरांनी वेळेत उपचार केले असते तर माझा भाऊ वाचला असता, असा आरोप दीपक गायकवाड यांनी केला.

बीपी, ईसीजी नॉ नॉर्मल होता: डॉक्टरांचा दावा

दरम्यान, मेडिसिन विभागाच्या प्रमुख डॉ. मीनाक्षी भट्टाचार्य यांनी दावा केला, की रुग्णाचा बीपी नॉर्मल होता. ईसीजीदेखील नॉर्मल होता. त्यानंतर छातीतील दुखणे कमी करण्याचे इंजेक्शन दिले.ॲसिडिटी कमी करण्याची गोळी दिली. रुग्ण नॉर्मल वाटल्यामुळे डिस्चार्ज दिला. मात्र त्यांना पुन्हा आणल्यानंतर त्यांचा अगोदरच मृत्यू झालेला होता. नवीन ईसीजी मशीन १५ दिवसापूर्वीच आणलेली असल्यामुळे सेटिंग करताना चूक झालेली आहे. मात्र, रुग्णासमोरच तो ईसीजी काढलेला असून त्यांना लगेच दिला, असा दावा त्यांनी केला.